# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १२/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील डुमरी पेट्रोल पंप समोर कन्हान येथे दिनांक १२/०८/२२ चे ०५.०० वा. ते ०५.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– बेनीराम शामराव वरणकर, वय ४४ वर्ष, रा.वंसतराव जानबा ढोपडे दुर्गा नगर, प्लॉट नं.२९९, हनुमान मंदीर जवळ एचपी पेट्रोल पंपच्या मागे हिंगणा रोड, नागपुर हे त्यांचा मुलगा नामे– कलश याचे सह दुचाकी वाहन क्र. एमएच– ४०/सीजे– ०२५१ ने श्रीकृष्ण चक्रधरस्वामी महानुभाव मंदीर मनसर वरुन आपल्या घरी नागपुर ला जात असता डुमरी पेट्रोल पंप समोर हायवे रोडवर कन्हान जवळ फिर्यादीचा मुलगा चालत्या गाडीवर मोबाईल त्याचा हातामध्ये घेवुन पाहत होता. त्यादरम्यान अचानक एका दुचाकी वाहनावर दोन अज्ञात आरोपी वय अंदाजे २५ ते ३० वयाचे फिर्यादीचे दुचाकी वाहनाजवळ मनसर कडुन कन्हान कडे जाणारे मार्गावरून मागुन वेगाने आले आणि फिर्यादीच्या मुलाच्या हातामधील विवो कंपनीचा मोबाईल फोन किमती अंदाजे १४,०००/–रु. चा जबरदस्तीने हिसकावुन कन्हान कडे वेगाने पळुन गेले. फिर्यादीने दुचाकी वाहनाने त्यांचा काही अंतरापर्यंत पाठलाग केला पण ते मिळाले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री मेश्राम मो.क्र ९९२३६२१२७५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील रिधोरा येथे दिनांक ११/०८/२२ चे २२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– आशिष रामभाउ बिघाने वय २७ वर्ष रा. मालापुर ता. नरखेड, ह.मु नागपूर हे राखी सणानिमित्य मालापुर येथे जात असता कोंढाळी मार्गे निघून कोंढाळी येथे मोटार सायकल थांबवून अर्धा निप दारू पिवून रिधोरा येथील गजानन मंदीरा जवळील बेंचवर झोपले होते. त्यादरम्यान आरोपी १) रूपेश दिलीप जवजांळ, वय १८ वर्ष १८ दिवस रा. रिधोरा, २) विशाल विनोद मुंगभाते, वय २२ वर्ष, रा. रिधोरा, ३) सुरज विरेंद्र मेश्राम, वय २८ वर्ष, रा. रिधोरा ता. काटोल ह.मु. लेडीपुरा कोंढाळी व ४) राजु पांडुरंग वाघाडे, वय ३३ वर्ष, रा. रिधोरा ता. काटोल ह.मु. टिचर कॉलनी कोंढाळी यांनी संगणमत करून फिर्यादीचे कानातील बाळी व चांदीची अंगठी एकुण कि. १६००/– रू. चा माल जबरीने हिसकावुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री संतोश निभोंरकर मो न ९५२७३४७४४३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**